महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ लिमिटेड यांच्या नागपूर- गोंदिया प्रवेश नियंत्रित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाचे बांधकाम पॅकेज - I अंतर्गत नागपूर जिल्हयातील गवसी ते गोंदिया जिल्हयातील लोधी टोला (Ch ०.००० ते Ch १४४.८०७). मुख्य संरेखना व्यतिरिक्त दोन फीडर मार्ग गोंदिया बायपास (Ch ०.००० ते Ch १३.७४४) आणि तिरोडा फीडर मार्ग (Ch ०.००० ते Ch ३.८२६) या प्रकल्पासाठी आवश्यक पर्यावरण विषयक मंजुरीकरीता जाहीर लोकसुनावणीचे दि. २७/०५/२०२५. वेळ दुपारी १२.३० वा चे इतिवृत्त.

*******

केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाच्या अधिसूचना दि १४/०९/२००६ व सुधारीत अधिसूचना दि. ०१.१२.२००९ तरतूदीनुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ लिमिटेड यांच्या नागपूर- गोंदिया प्रवेश नियंत्रित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाचे बांधकाम पॅकेज - I अंतर्गत नागपूर जिल्हयातील गवसी ते गोंदिया जिल्हयातील लोधी टोला (Ch ०.००० ते Ch १४४.८०७). मुख्य संरेखना व्यतिरिक्त दोन फीडर मार्ग गोंदिया बायपास (Ch ०.००० ते Ch १३.७४४) आणि तिरोडा फीडर मार्ग (Ch ०.००० ते Ch ३.८२६) या प्रकल्पासाठी आवश्यक पर्यावरण मंजुरीसाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक २७/०५/२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता, जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया, येथे मा. श्री. भैय्यासाहेब रामराव बेहेरे, निवासी उप-जिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, गोंदिया यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्रीमती. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीचे सदस्य उपस्थित होते व श्री. किशोर पुसदकर, उप-प्रादेशिक अधिकारी, भंडारा यांनी समन्वयक म्हणून काम केले. सदर जनसुनावणीस श्री. चंद्रभान म. खंडाईत, उप-विभागीय अधिकारी, गोंदिया/तिरोडा उपस्थित होते. अध्यक्षांच्या संमतीने दुपारी १२.३० वाजता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांची यादी सोबत जोडलेली आहे. **(सहपत्र-1).**

## पार्श्वभूमी

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी पॅकेज - I अंतर्गत नागपूर जिल्हयातील गवसी ते गोंदिया जिल्हयातील लोधी टोला (Ch ०.००० ते Ch १४४.८०७). मुख्य संरेखना व्यतिरिक्त दोन फीडर मार्ग गोंदिया बायपास (Ch ०.००० ते Ch १३.७४४) आणि तिरोडा फीडर मार्ग (Ch ०.००० ते Ch ३.८२६) पर्यावरण मंजुरीसाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी मंडळास अर्ज सादर केला होता. मंडळाचे मुख्यालयाने पत्र क्रं.MPCB/JD.(WPC)/ENV-PH/B-250106-FTS-0108 date. 06/01/2025, MPCB/JD.(WPC)/ENV-PH/B-250220-FTS-0051 date. 20/02/2025, अन्वये जनसुनावणी प्रक्रिया सुरु करण्याबाबत निर्देश प्रदान केले होते. मा. जिल्हाधिकारी भंडारा यांनी कार्यालयीन टिप्पणी दि. ०३/०४/२०२५ अन्वये दि. २७/०५/२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता जिल्हा नियोजन भवन, गोंदिया येथे जनसुनावणी घेण्याबाबत मंजुरी प्रदान केली होती.

## प्रयोजन व कार्यपध्दती

उप-प्रादेशिक अधिकारी, भंडारा तथा संयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली, व जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही, असे स्पष्ट केले. या जाहीर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व समितीकडे पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप लेखी अथवा तोंडी सादर करावयाचे आहेत, त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, भंडारा यांनी भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचना दिनांक 14 सप्टेंबर 2006 नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक १६/०४/२०२५ ला दैनिक द हितवाद (इंग्रजी) व दैनिक लोकमत (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना तिस दिवसांच्या मुदतीसह प्रसिध्द करण्यात आली असल्याचे सांगितले. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. (**सहपत्र**-2).

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या, पर्यावरण आघात मुल्यनिर्धारण अहवालाच्या संक्षिप्त विवरणाची प्रत व इतर माहिती असलेले कागदपत्रे (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. मंडळाचा आदेश क्र. E-32/2025 पत्र क्र. BO/JD.(WPC)/ENV-PH/B-250421-FTS-0121 date.21/04/2025 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडलेली आहे. (सहपत्र-3). सुनावणी पूर्वी एकही आक्षेप प्राप्त झाला नाही.

सदर प्रकल्पाबांबत प्रकल्प धारंकानी सादर केलेली कार्यकारी सारांश इंग्रजी आणि मराठीत सॉफ्ट कॉपीसह खालील कार्यालयात लोकांच्या माहितीसाठी आणि अभ्यासासाठी ठेवण्यात आले होते व याबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आले होते.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया.
२. जिल्हा परिषद, गोंदिया.
३. जिल्हा उदयोग केंद्र, गोंदिया.
४. उप-विभागीय अधिकारी गोंदिया, तिरोडा, जि. गोंदिया.
५. तहसिलदार, तहसिल कार्यालय गोंदिया, तिरोडा, जि. गोंदिया.
६. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, ५ वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपुर.
७. पर्यावरण व वातावरण बदल विभाग, १५ वा माळा, नवी प्रशासकीय इमारत, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ३२.
८. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरु पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कल समोर सायन (पूर्व), मुंबई – २२.
९. क्षेत्रिय कार्यालय (पश्चिम मध्य क्षेत्र), पर्यावरण, वने व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भू-तल, पूर्व खंड, नवीन सचिवालय भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ०१.
१०. ग्रामपंचायत कार्यालय, दवनीपाडा, पिपरटोला, देऊटोला, सोनपुरी, निला गोंडी, रतनारा, लोहारा, पांढराबोडी, लोहितोला, नवाटोला, हिवरी, लोधी टोला २३, लोधी टोला २२, हलबी टोला, सावरी, हिवरा, भागवतटोला, ढाकनी, लोधी_टोला २७, पिंडकेपारटोला, रापेवाडा, कारंजा, ता. गोंदिया, जि. गोंदिया.
११. ग्रामपंचायत कार्यालय, मनोरा, केसलवाडा, यदमेकोट, पांजरा, सरांडी, उमरी, धांद्री, बेलाटी (बु.), बेलाटी (खु), चिरखानी, केवलेवाडा, भुराटोला, पालडोंगरी, कार्ती (बु.), बर्डीपार, डब्बेटोला, सोनेगाव, नाहरटोला, बोडा, जामुनिया, कचेवानी, ता. तिरोडा, जि. गोंदिया.

तसेच कार्यकारी सारांश मंडळांचे संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेली होती.

प्रकल्प धारकांचे तांत्रीक सल्लागार यांनी तपशिलवार मराठी मध्ये गोंदिया जिल्हयातील प्रस्तावित महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ लिमिटेड यांचे नागपूर- गोंदिया प्रवेश नियंत्रित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाचे बांधकाम पॅकेज - I अंतर्गत नागपूर जिल्हयातील गवसी ते गोंदिया जिल्हयातील लोधी टोला (Ch ०.००० ते Ch १४४.८०७). मुख्य संरेखना व्यतिरिक्त दोन फीडर मार्ग गोंदिया बायपास (Ch ०.००० ते Ch १३.७४४) आणि तिरोडा फीडर मार्ग

(Ch ०.००० ते Ch ३.८२६) बाबत माहीती, पर्यावरण व्यवस्थापन योजना, व्यावसायीक आरोग्य आणि सुरक्षा व्यवस्थापन, हरित पट्टा विकास योजना, प्रकल्पाचे फायदे, पर्यावरण व्यवस्थापन योजना- खर्च, इत्यादीबाबत सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, भंडारा यांनी उपस्थित जनसमुदायाला, सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्याचे त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, किंवा लेखी सादर करावे असे आवाहन केले. प्राप्त लेखी आक्षेप/निवेदनाच्या प्रती सोबत जोडलेल्या आहेत. एकुण — ३७.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) चंद्रकुमार गोपीचंद पटले, पालडोंगरी, गोंदिया.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | १. या महामार्गामुळे गोंदिया जिल्हयातील शेतकऱ्यांना कोणताच फायदा नाही. फक्त उदयोगपती व काही हितसंबधी लोकांच्या फायदयासाठी आहे.<br>२. या महामार्ग प्रकल्पामध्ये गोंदिया जिल्हयातील 1000 ते 1500 एकर शेतजमिन जात आहे. यापूर्वी महाराष्ट्रामध्ये गोंदिया जिल्हयातील सर्वाधिक शेतजमिन विविध प्रकल्पामध्ये जसे वनकायदा, भूदान, झुडपी जंगल, वन्यजिव कायदा मध्ये मोठया प्रमाणात भूसंपादीत केली आहे व सर्व कायदे शेतकऱ्यांसाठी शत्रु ठरले आहे व हा महामार्ग प्रकल्प शेतकऱ्यांच्या जिवावर उठणारा आहे.<br>३. शासनाचे मोबदला दर कमी आहे व त्यामध्ये नविन जमीन घेता येत नाही.<br>४. या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होणार त्यामुळे शासनाने या प्रकल्पाचा पुर्णविचार करावा.<br>५. या प्रकल्पामुळे पर्यावरणाचे नुकसान होणार आहे कारण मालगुजारी तलाव, लहान तलाव नष्ट होतील व शेतकऱ्यांच्या जिवनावर प्रभाव पडेल, त्यामुळे हा प्रकल्प स्थगीत करावा. | **श्री. निशीकांत सुके, अप्पर जिल्हाधिकारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ** -<br>१. गेल जमिन अधिग्रहीत करीत नाही परंतु पाईप लाईन टाकण्यासाठी परवानगी घेतात पाईप लाईनच्या जागेवर बांधकामास स्थगिती असते. गेलचा मोबदला व इतर भूसंपादनाच्या मोबदला देण्यामध्ये फरक आहे.<br>२. जमिनीची मोजणी झाल्यानंतर एक अधिसुचना निघेल व प्रत्येकाला वैयक्तीक नोटीस येईल, त्यावेळी मोबदला बाबत आपली बाजू एकून घेण्यात येईल. पुरावे असतील तर सादर करण्यात यावे जेणेकरुन योग्य मोबदला निश्चित करण्यात मदत होईल.<br>३. गावाचा रेट एक निघतो, वैयक्तिक निघत नाही, त्यानुसार मोबदला निश्चित होतो.<br>४. रेडिरेकनरचा दर व खरेदी विक्रीचे दर यापैकी जे जास्त असेल ते दर मोबदला निश्चित करण्यासाठी गृहीत धरण्यात येते.<br>५. ओलीताप्रमाणे दर निश्चित करण्यात येते.<br>६. आपल्याकडील सर्व पुरावे उपविभागीय अधिकारी भूसंपादन यांचेकडे देण्यात यावे व जमिनीचा जास्तीत जास्त दर कसा देता येईल याबाबत आमचा प्रयत्न आहे.<br>७. मोबदल्याची रक्कम एकरक्कमी देण्यात येईल. |

२) श्री. तिलोकचंद जगदीश पटले, पालडोंगरी जि.गोंदिया.

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | १. गोंदिया जिल्हयातील सर्वात जास्त जमिन पालडोंगरी गावातून संपादित होत आहे.<br>२. आमच्या गावातून गेल इंडियाचा प्रकल्प गेलेला आहे व शेतकऱ्यांना अत्यल्प मोबदला मिळाला. शेतकऱ्यांना न्याय नाही मिळाला तर न्यायालयात धाव घेतील त्यामुळे शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मोबदला देण्यात यावा. प्रति एकर 1.5 कोटी रु. शेतकऱ्यांची मागणी आहे.<br>३. गोंदिया जिल्हयात इतर जिल्हयाच्या मानाने शेतामध्ये झाडांचे प्रमाण जास्त आहे. या महामार्ग प्रकल्पामुळे मोठया प्रमाणांत झांडाची कत्तल होणार आहे त्यामुळे पर्यावरणाचे नुकसान होईल.<br>४. गोंदिया जिल्हयामध्ये पावसाचे प्रमाण जास्त आहे. या महामार्गाची उंची जास्त असल्याने पुरसदृष्य स्थिती निर्माण होईल व पुराच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी व्यवस्था करणे आवश्यक आहे.<br>५. शेतकऱ्यांना शेतीसाठी महामार्गाच्या दोन्ही भागास सर्विस रस्त्यांची व्यवस्था व्हावी.<br>६. शेंतकऱ्यांचा मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन शेतकऱ्यांना न्याय दयावा. | **श्री. भुषण मालखंडाळे, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ –**<br>१. नोंदविलेले सर्व आक्षेप प्रामुख्याने भूमी अधिग्रहणाबाबत आहे व हा विषय या पर्यावरण विषयक जनसुनावणीचा नाही पंरतु भूमी अधिग्रहणाबाबत खातेदारांना जिल्हाधिकारी गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली समितीकडे असून यातील प्रत्येक टप्प्यामध्ये खातेदारांना सहभागी करुन घेऊन शेवटच्या टप्प्यामध्ये मोबदला दर समितीव्दारे निश्चित केला जातो.<br>२. गोंदिया जिल्हयात या प्रकल्पाची एकूण 68 किमी लांबी आहे व त्याकरीता 5000 झाडे कापावी लागणार आहे. नागपूर गोंदिया या पूर्ण लांबीमध्ये महामार्गाच्या दोन्ही बाजूस एकूण 4,27,000 झाडे लावणार आहोत.<br>३. महामार्गाची उंचीजरी जास्त असली तरी दोन्ही बाजुस नाली असणार आहे त्यामुळे पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होईल<br>४. महामार्गाच्या दोन्ही बाजुस 3.5 मिटर रुंदीची जागा सलग सोडण्यात येणार आहे यावरुन शेतकऱ्यांना वहिवाट करता येईल, तसेच 500 मिटर अंतरावर भुयारी मार्ग करण्यात येणार आहे जेणेकरुन दोन्ही बाजुस जाता येईल.<br>५. जमिन, पाणी व हवेच्या प्रदुषणासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील याची हमी देण्यात येते. पर्यावरण संरक्षणासाठी जेवढे झाडे तोडणार त्याच्या किती तरी अधिक पटीने झाडे लावण्यात येतील. |

३) श्री.कापसे, जि.गोंदिया.

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | १. शेंतकऱ्यांच्या खूप समस्या आहेत. शेतजमीनीच्या मालकी हक्काबाबत समस्या आहेत त्यामुळे ज्याची जमीन आहे त्याला मोबदला मिळत नाही तरी प्रशासनास विनंती आहे की जमीनीच्या मालकीहक्काबाबत | |

| | | |
|---|---|---|
| | समस्या निवारण करण्यात यावी. | |

४) **श्री.कुशल चेतराम सहारे, केसलवाडा, जि. गोंदिया.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | १. या महामार्गास समर्थन आहे.<br>२. ज्याची शेती बाधीत होत आहे त्यास प्रकल्पग्रस्त म्हणून घोषित करावे व परिवारातील एका सदस्यास नोकरी देण्यात यावी.<br>३. एकरक्कमी मोबदला देण्यात यावा. जेणेकरुन नविन शेतजमिन घेणे सोयीचे होईल.<br>४. शेतकऱ्यांची पिळवणूक होऊ नये या बाबत काळजी घेण्यात यावी. | |

५) **श्री.गेंदलाल एकनाथ ठाकरे, निलागोंदी, जि. गोंदिया.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | १. हा महामार्ग येत असल्यामुळे आंनदच आहे परंतु या महामार्गामुळे शेतकरी बेहाल होणार आहे.<br>२. आमची पिढीजात शेती असून ती महामार्गात जात असल्याने पुढच्या पिढीची आम्हास चिंता आहे.<br>३. त्यामुळे आम्हाला नविन शेती घेण्यासाठी भरपूर मोबदला एकरक्कमी देण्यात यावा. | |

६) **श्री.राजेंद्र हिरामन रहांगडाले.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | १. ज्यांची शेती महामार्गामध्ये जाणार ते भूमिहिन होणार व त्यांची स्थिती दयनिय होणार. त्यांच्या मुलांना लग्नाकरीता मुली मिळणार नाही. शेतकरी अन्नदाता आहे त्याची शेती गेल्यावर तो रस्त्यावर येणार त्याला सुध्दा मासिक पेंशन देण्यात यावी. बाजाराभावाच्या पाचपट मोबदला देण्यात यावा. | |

७) **श्री. रामदास हरीचंद्र हरिनखेडे, बिजूटोला, जि. गोंदिया.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | १. या महामार्गामुळे ज्यांची शेती जाणार ते अल्पभूधारक तसेच भुमिहीन पण होणार आहेत यात शेतकऱ्यांचे काहीच भल नाही, शेतकरी महामार्गाने जाणार नाही. प्रदूषणाचा परिणाम | |

| | | |
|---|---|---|
| | शेंतकऱ्यावर जिवनावर होईल.<br>२. शेती गेल्यामुळे शेतकरी द्रारीद्ररेषेखाली जाईल आणि त्याची परिस्थिती खालावली जाईल. म्हणून बाजारभावाच्या पाचपट मोबदला देण्यात यावा. शेतकऱ्यास समृध्द करण्यासाठी योग्य मोबदला व परिवारातील सदस्याला शासकिय नोकरी देण्यात यावी. | |

**८) श्री. राहुल रहांगडाले, जमुनिया, जि. गोंदिया.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | जमुनिया गावातील शेत जमिन तलावाच्या प्रकल्पामध्ये संपादित झालेली आहे. गावाला लाभ झालेला नाही परंतु इतर गांवाना त्या तलावाचा लाभ झालेला आहे. या प्रकल्पामुळे परत शेंतकऱ्याच्या शेती जातील व त्यांचे नुकसान होईल. शेतकरी अल्पभूधारक झालेले आहे. | |

**९) श्री. जिंदल हरिचंद कटले, जिबुटोला, ता. तिरोडा, जि. गोंदिया.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | १. आमच्या गावाशेजारी अदानी पावर प्लॉट आहे त्याचा गावाला लाभ नाही. माझी 7 एकर जमिन महामार्गामध्ये जात असून फक्त एक एकर जमीन उरत आहे मी काय करावे. या प्रकल्पाबाबत आमचे काहीही म्हणणे नाही, परंतु शासकीय मोबदला पुरेसा नाही. शेंतकऱ्यांना योग्य मोबदला मिळण्यात यावा व परिवारातील एका सदस्यास शासकीय नोकरी दयावी. | |

**१०) श्री. रविंद्र घनश्याम सोनबावने, मनोरा, जि. गोंदिया.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | १. या महामार्गामुळे शेतकऱ्यांचा काहीच फायदा नाही, यात व्यापांराचा आणि मोठया लोंकाचा फायदा आहे.<br>२. जसा या महामार्गाबद्दल माहिती झाली तसे मोठया मोठया व्यापारी लोंकानी शेतजमीनी खरेदी करुन बागायती करुन ठेवल्या त्यामुळे त्यांना मोठा मोबदला लाटता येईल परंतु शेंतकऱ्यांचा काहीच फायदा नाही.<br>३. या प्रकल्पाची माहीती व्यापांराना आधिच माहीती कशी मिळाली असा माझा शासनास सवाल आहे.<br>४. बाजारभावापेक्षा कमी मोबदल्यामध्ये | |

| | | |
|---|---|---|
| | शेतकऱ्यांची जमीन संपादित करण्यात येऊ नये.<br>५. आपण सांगितले गोंदिया जिल्हयामध्ये 5000 झाडे कापली जाणार पण हा चुकीचा आकडा आहे. गोंदियापासुन ते मनोरापर्यंत 1,25,000 ते 1,50000 झाडे कापल्या जाणार आहे, कारण शेंतकऱ्यांच्या 7/12 उताऱ्यावर झांडाची पूर्णपणे नोंद नाही. | |

**११) श्री. रमेश उमाजी गजभिये , जिऊटोला, जि. गोंदिया.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | १. महामार्गाचा आराखडा तयार करताना शेतकऱ्यांना न विचारता कसा काय करण्यात आला, प्रथम शेतकऱ्यांना विश्वासात न घेता महामार्ग प्रकल्प आराखडा कसा काय करण्यात आला.<br>२. जमिन भूसंपादनाकरीता आमच्या अटींचा विचार करण्यात यावा.<br>• प्रत्येक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रती रु. 2 कोटी एकर मोबदला देण्यात यावा.<br>• प्रकल्पग्रस्त भूमिहिन शेतकऱ्यांच्या मुला/मुलींना शासकीय नोकरी देण्यात यावी.<br>• प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यास पर्याय सिंचित जमीन देण्यात यावी.<br>• भूमिसंपादन कायदा 2013 अंतर्गत व इतर कायदयाअंतर्गत मिळणारे हक्क व लाभ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांस देण्यात यावे.<br>• भूमिसंपादन कायदया अंतर्गत पुर्नवर्सन बाबत सर्व लाभ व हक्क देण्यात यावे.<br>• महामार्ग टोलटॅक्स लाभातून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना 18% लाभाचा हिस्सा देण्यात यावे.<br>• सी.एम किसान सन्मान निधी व नमो सन्मान निधी देण्यात यावी.<br>• भूमी संपादन कायदा अंतर्गत अनुसुचित जाती व जमाती यांना विशेष लाभ व सवलती, सुविधा देण्यात यावी.<br>• भूमीसंपादन कायदा 2013 नुसार प्रकल्पग्रस्त शेंतकऱ्याची व ग्रामसभेची सहमती घेतल्याशिवाय भूमिसंपादन प्रक्रिया करण्यात येऊ नये.<br>• शेतकऱ्यांच्या अटी पाळल्याशिवाय व त्यांना विश्वासात घेतल्याशिवाय जमीन संपादित | |

| | | |
|---|---|---|
| | करु नये<br>• भूमी संपादन कायदा प्रक्रिया अंतर्गत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट 2 कोटी रु. नुकसान भरपाई देण्यात यावी. | |

**१२) श्री. राहुल कोचे, जि. गोंदिया.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | एक झाड पूर्ण जिवनकाळामध्ये 30 kg कार्बन उत्सर्जित करते व एक वाहन पूर्ण जिवनकालामध्ये 4.6 टन कार्बन उत्सर्जित करतो तर याचे बॅलस कसे करणार. | |

**मा. अध्यक्ष लोकसुनावणी समिती**

पर्यावरण विषयक जनसुनावणीस उपस्थित सर्वाचे स्वागत करतो. सर्वानी उपस्थित केलेल्या आक्षेपाची, सुचनांची महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी, पर्यावरण विषय, इतर बाबीबाबत करण्यात येणाऱ्या उपाययोजनाबाबत अवगत केले आहे व खात्री दिलेली आहे की जास्तीत जास्त प्रमाणात झाडे लाऊन प्रदूषण मोठया प्रमाणात टाळणार आहेत.

भुसंपादनाबाबत असलेल्या अडचणी व समस्या बाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अप्पर जिल्हाधिकारी यांनी माहीती दिलेली आहे व भुसंपादन कायदयाच्या तरतुदींच्या आधिन राहूनच मोबदला निश्चित केला जातो.

जमिनीच्या मालकी हक्काबाबतच्या समस्याबाबत भूमिअभिलेख व भूसंपादन अधिकारी यांचे कडे अर्ज करण्यात यावा. मोबदला एकरक्कमी मिळणार आहे व भूसंपादन कायदा च्या तरतूदीप्रमाणे शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे.

प्राप्त सुचना आक्षेपांची नोंद घेण्यात आली असुन समितीकडे सादर करण्यात येईल.

आभार व्यक्त करुन जनसुनावणी संपन्न झाली.

**(किशोर पुसदकर)**
**उप-प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि.मंडळ, भंडारा व**
**समन्वयक, लोक सुनावणी समिती**

**(हेमा देशपांडे)**
**प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि.मंडळ, नागपूर व**
**सदस्य, लोक सुनावणी समिती**

**(भैय्यासाहेब बेहेरे)**
**अप्पर जिल्हादंडाधिकारी व**
**अध्यक्ष, लोक सुनावणी समिती**